बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी)नियम,१९९८ च्या अंतर्गत ॲथोरायझेशनसाठी सुधारित फी आकारण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्रमांक - इएनव्ही/२०९८/५५९/प्र.क्र.२५९/तां.क.१
नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,
मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० एप्रिल २००३.

पहा : (१) शासन निर्णय क्रमांक इएनव्ही /२०००/२८०/प्र.क्र.२०/तां.क.३,दि.२० एप्रिल २०००.

शासन निर्णय :- पर्यावरण (संरक्षण )अधिनियम,१९८६ (२९/१९८६) च्या कलम ६,८ आणि २५ अन्वये केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालय यांच्या सूचना क्रमांक : एस ओ -६३० (ई) ,दिनांक २० जुलै १९९८ प्रमाणे बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम १९९८ प्रकाशित करण्यात आले आहेत.

बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम,१९९८ मधील नियम क्रमांक ८ (३) अन्वये राज्य शासनाला बायोमेडिकल वेस्ट नियमांतर्गत ॲथोरायझेशनसाठी अर्ज करताना फी विहित करण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्रमांक इएनव्ही -२०००/२८०/प्र.क्र.२०/तां.क.३, दिनांक २० एप्रिल २००० नुसार बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम,१९९८ अंतर्गत ॲथोरायझेशन फी निश्चित करण्यात आली. तथापि, राज्य शासनाला बायोमेडिकल वेस्ट नियमांतर्गत ॲथोरायझेशनसाठी लहान रुग्णालये व शुश्रुषालये यांची फी जास्त असल्याबद्दल वेगवेगळया मेडिकल असोसिएशनकडून निवेदने प्राप्त झाली. त्या निवेदनांचा विचार करुन राज्य शासनाने सदर फी चे पुनर्निधारण करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार ॲथोरायझेशन फी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

अ) रुग्णालये व शुश्रुषालये

(१) १ ते ५ रुग्णशय्यापर्यन्त------------------ फी आकारण्यात येणार नाही.

2.......

medical

एम. २३६ (३.०९.०३) [ कृ.मा.प.

३५ ५१

| | |
|---|---|
| | रु.१,२५०/- प्रतिवर्षी. |
| (२) ६ ते २५ रुग्णशय्यापर्यन्त | रु.२,५००/- प्रतिवर्षी |
| (३) २६ ते ५० रुग्णशय्यापर्यन्त | रु.५,०००/- प्रतिवर्षी |
| (४) ५१ ते २०० रुग्णशय्यापर्यन्त | रु.१०,०००/- प्रतिवर्षी |
| (५) २०१ ते ५०० रुग्णशय्यापर्यन्त | रु. १५,०००/-प्रतिवर्षी |
| (६) ५०१ ते त्यावरील रुग्णशय्या | रु.१०,०००/- प्रतिवर्षी |
| ब) बायो -मेडिकल वेस्टबाबत सुविधा पुरविणारे : | रु.७,५००/- प्रतिवर्षी |
| क) बायो मेडिकल वेस्टचे वाहतुकदार | |
| ड) बायो - मेडिकल वेस्ट उत्पन्न करणा-या/हाताळणा-या इतर सर्व संस्था (वरील " अ ", " ब ", " क " व्यतिरिक्त ) | रु.२,५००/-प्रतिवर्षी |

सर्व शासकीय रुग्णालये यांना बायोमेडिकल वेस्ट (व्यवस्थापन व हाताळणी) नियम,१९९८ च्या अंतर्गत ऑथोरायझेशनसाठी फी आकारण्यात येणार नाही.

सुधारित फी संरचना, हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

गजानन वराडे

(ग.नि.वराडे)
संचालक

प्रति.
मा.मुख्यमंत्री यांचे उपसचिव, मंत्रालय,मुंबई
मा.मंत्री,पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री, पर्यावरण,यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
सर्व महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
संचालक,आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव,आरोग्य सेवा तांत्रिक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, ठाणे विभाग,ठाणे.
निवड नस्ती,

—— xox ——

bio medical
एच - 236 (1000-4-03).

36 18